# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

पुण्य नगरी
पुणे ■ सोमवार, २२ सप्टेंबर २०१४
८

# खेडमधील मतदारांना शपथ

## विद्यार्थ्यांनी काढली जनजागृती फेरी

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील मतदारांना जिल्हा मतदार जनजागृती निवडणूक अधिकारी घनश्याम गोयल यांनी आज शपथ दिली.

राजगुरुनगर येथे तहसीलदार कार्यालयात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना आणि आळंदी येथे संत ज्ञानेश्वर मंदिराच्या परिसरात आळंदी ग्रामस्थांना जिल्हा मतदार जनजागृती निवडणूक अधिकारी घनश्याम गोयल यांनी मतदान करण्याची शपथ दिली. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आज राजगुरूनगर शहरातून मतदान हक्क जनजागृती प्रभात फेरी काढली. येथील तहसीदार कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमासाठी जिल्हा सह निबंधक अरुण काकडे, खेड-आळंदी विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी हिम्मतराव खराडे, तहसीलदार प्रशांत आवटे, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. स्मिता कोळेकर, लतादेवी वाजे, तलाठी चोरमले, अविनाश कुलकर्णी, गणेश दुबे, नीलेश घोडके यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे २५० विद्यार्थी उपस्थित होते.

आळंदी येथील शपथ कार्यक्रमासाठी आळंदी नगर परिषदेचे मुख्याधिकारी अविनाश औंधकर, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, डी. डी. भोसले, संजय घुंडरे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी हिम्मतराव खराडे यांनी शपथ दिली.




**राजगुरूनगर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना मतदान करण्याबाबत शपथ देताना पुणे जिल्हा मतदार जनजागृती निवडणूक अधिकारी घनश्याम गोयल.**

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख